**क्रमांक : ७०**

**महाराष्ट्र विधानपरिषद**

**पत्रक भाग-दोन**

**गुरुवार, दिनांक १५ जुलै,२०२१/आषाढ २३, शके १९४३.**

संदर्भ : १) या सचिवालयाचे पत्रक भाग-दोन क्रमांक ४६, गुरुवार, दिनांक ६ मे, २०२१
२) या सचिवालयाचे पत्रक भाग-दोन क्रमांक ५३, सोमवार, दिनांक २८ जून, २०२१

**७४.** सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीची मंगळवार, दिनांक २२ जून, २०२१ रोजी झालेल्या बैठकीत सन २०२१ च्या द्वितीय (पावसाळी) अधिवेशनात प्रश्नोत्तरे घेण्यात येणार नसल्याचे तसेच स्वीकृत प्रश्न व्यपगत करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. यानुषंगाने या अधिवेशनासाठी विभागाकडे उत्तरासाठी पाठविण्यात आलेले तारांकित स्वीकृत प्रश्न व वस्तुस्थितीसाठी विभागाकडे पाठविण्यात आलेले प्रश्न तसेच मा.सदस्यांना पाठविण्यात आलेले खुलाशाचे प्रश्न व्यपगत करण्यात आले होते.

तथापि, सोमवार, दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी विधानपरिषद सभागृहात व्यपगत प्रश्न अतारांकित स्वीकृत करण्याबाबत उपस्थित केलेल्या मुद्दयाच्या अनुषंगाने मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिलेल्या निदेशानुसार या अधिवेशनाकरिता विभागाकडे उत्तरासाठी पाठविण्यात आलेले तारांकित स्वीकृत प्रश्न अतारांकित स्वीकृत करण्यात आले आहेत. तसेच, वस्तुस्थितीचे प्रश्न / सदस्य खुलाशाचे प्रश्न विधानपरिषद नियमातील तरतुदींच्या अनुषंगाने व्यपगत करण्यात आले आहेत.

विधान भवन,
मुंबई
दिनांक : १५ जुलै, २०२१

राजेन्द्र भागवत,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद

याची प्रत :

१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य
२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष
३) संगणक कक्ष (वेबसाईट) / MKCL कक्ष